**अंत्योदय अन्न योजना लाभार्थ्यांची निवड व अंमलबजावणी बाबत.**

# महाराष्ट्र शासन

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः शिवाप-२०१३/प्र.क्र.२८६/नापु-२८**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १७ जुलै, २०१३

<u>वाचा -</u>

**१) शासन पत्र क्रमांक: साविव्य-१००१/प्र.क्र.४६६ (ब)/नापु-२८, दि.१३.२.२००१**
**२) शासन निर्णय क्रमांकः साविव्य-१००१/प्र.क्र.४६६(ब)/नापु-२८,दि.८.५.२००१**
**३) शासन निर्णय क्रमांकः साविव्य-१००३/२६७२/प्र.क्र.१२८८/नापु-२८, दि.१६.१०.२००३**
**४) शासन परिपत्रक क्रमांकः साविव्य-१००३/२६७२/प्र.क्र.१२८८/नापु-२८, दि.१२.११.२००३**
**५) शासन पत्र क्रमांकः साविव्य-१००४//प्र.क्र.१५८३(२) /नापु-२८, दि.१६.८.२००४**
**६) शासन निर्णय क्रमांकः साविव्य-१००४/२००८/प्र.क्र.१५८३/नापु-२८, दि.१०.१२.२००४**
**७) शासन पत्र क्रमांकः साविव्य-१००५/प्र.क्र.१७७९/नापु-२८, दि.३.१०.२००५**
**८) शासन निर्णय क्रमांकः साविव्य-१००५/प्र.क्र.१७७९/नापु-२८, दि.२०.१०.२००५**
**९) शासन शुध्दीपत्र क्रमांकः साविव्य-१००५/प्र.क्र.१७७९/नापु-२८, दि.२५.११.२००५**
**१०) शासन परिपत्रक क्रमांकः साविव्य-१००५/प्र.क्र.१७७९/नापु-२८, दि.३१.०५.२००७**
**११) शासन परिपत्रक क्रमांकः साविव्य-१००९/१७९६/प्र.क्र.३०८/नापु-२८, दि.११ .९.२००९**
**१२) शासन पत्र क्रमांक: साविव्य-२०१०/प्र.क्र.२४२/नापु-२८, दिनांक १७ सप्टेंबर, २०११**

<u>प्रस्तावना -</u>

केंद्र शासनाने दिनांक २५ डिसेंबर,२००० रोजी अंत्योदय अन्न योजनेची घोषणा केली होती. सदर योजनेअंतर्गत गरिबातील गरीब कुटुंबाना दरमहा ३५ किलो धान्य गहू-२ रुपये व तांदूळ- ३ रुपये प्रती किलो या दराने वितरीत करण्यात येत आहे.

संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णयानुसार केंद्र शासनाने अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी १०,०१,७०० इतका लाभार्थी कुटुंबांचा इष्टांक मंजूर केला होता. तद्‌नंतर संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णया नुसार केंद्र शासनाने विस्तारीत अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी ५,,०१,१०० इतका लाभार्थी कुटुंबांचा इष्टांक मंजूर केला होता. तद्‌नंतर संदर्भ क्र. ६ येथील शासन निर्णया नुसार केंद्र शासनाने द्वितीय विस्तारीत अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी ४,,८१,००० इतका लाभार्थी कुटुंबांचा इष्टांक मंजूर केला होता. तद्‌नंतर संदर्भ क्र. ७ येथील शासन पत्रानुसार केंद्र शासनाने तृतीय विस्तारीत अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी ५,२१,५०० इतका लाभार्थी कुटुंबांचा इष्टांक मंजूर केला होता.

अशाप्रकारे केंद्रशासनाने राज्यासाठी एकुण २५,०५,३०० इतका अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थी कुटुंबांचा इष्टांक मंजूर केला आहे. सदर लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी केंद्र शासनाने

वेळोवेळी राज्य शासनास केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार पात्र लाभार्थ्यांना अंत्योदय अन्न योजनेचे लाभ देण्याबाबत सर्व संबंधितांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत.

(१) ज्या कुटुंबांचे प्रमुख विधवा स्त्रिया अथवा आजारी वा अपंग किंवा ६० वर्षे वयावरील वृध्द आहेत व ज्यांना उदरनिर्वाहाचे निश्चित साधन नाही अथवा सामाजिक आधार नाही.

(२) एकटे राहात असलेले दुर्धर आजारग्रस्त / अपंग / विधवा / ६० वर्षावरील वृध्द, ज्यांना कुठलाही कौटुंबिक वा सामाजिक आधार अथवा कायम स्वरुपी उत्पन्नाचे साधन उपलब्ध नाही.

(३) आदिम आदिवासी कुटुंबे (माडीया, कोलाम, कातकरी)

(४) भूमिहीन शेतमजूर, अल्पभूधारक शेतकरी, ग्रामीण कारागीर उदा कुंभार,चांभार,मोची,विणकर,सुतार तसेच झोपडपट्टीतील रहिवासी विशिष्ट क्षेत्रात रोजंदारीवर काम करुन उपजिविका करणारे नागरिक जसे हमाल, मालवाहक, सायकल, रिक्षा चालविणारे, हातगाडीवरुन मालाची ने-आण करणारे, फळे आणि फुले विक्रेते, गारुडी, कच-यातील वस्तु गोळा करणारे तसेच निराधार व अशा प्रकारे काम करणारे शहरी तसेच ग्रामीण भागातील व्यक्तींची कुटुंबे.

(५) कुष्ठरोगी / बरा झालेला कुष्ठरोगी कुटुंब प्रमुख असलेली कुटुंबे.

२. संदर्भ क्र. ११ येथील शासन परिपत्रकानुसार सार्वजनिक वितरण व्यवस्था (नियंत्रण) आदेश २००१ च्या परिशिष्टामधील परिच्छेद १ नुसार राज्य शासनाने अशा सूचना दिल्या होत्या की अंत्योदय अन्न योजनेचा आढावा घेऊन त्यापूर्वी जर अपात्र कुटुंबे निवडण्यात आली असल्यास ती वगळून पात्र कुटुंबांचा समावेश करावयाचा असल्यामुळे राज्यशासनाने दरवर्षी १ जानेवरी ते ३१ जानेवारी पर्यंत विशेष मोहिम राबवून सध्याच्या अंत्योदय अन्न योजनेच्या याद्यांचे पुनर्विलोकन करुन त्यामध्ये अपात्र ठरविण्यात आलेल्या शिधापत्रिका अन्य पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरीत करताना एचआयव्ही/एड्स बाधीत नागरिकांना प्राधान्य द्यावयाचे आहे. ही प्रक्रिया शासनाने विहित करुन दिलेल्या इष्टांकाच्या मर्यादेतच करावी, अशा सूचना वेळोवेळी वरील शासन निर्णयान्वये क्षेत्रीय अधिका-यांना देण्यात आलेल्या आहेत.

३. केंद्र शासनाने दिनांक १६ मार्च, २००४ व १९ नोव्हेंबर, २००४ च्या पत्रान्वये राज्य शासनास सूचना दिल्या होत्या की **अंत्योदय अन्न योजनेसाठी पात्र असलेल्या लाभार्थ्यांची नावे बीपीएल यादीत नसली तरी सुद्धा त्या पात्र लाभार्थ्यांना अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिका देण्यात याव्यात व त्याचवेळी त्यांची नावे बीपीएलच्या यादीत समाविष्ट करण्यात यावीत**. तथापि केंद्र शासनाने संबंधित राज्य शासनास मंजुर केलेल्या एकूण बीपीएल व अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थ्यांच्या इष्टांकाच्या मर्यादेतच सदर लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी.

४. **केंद्र शासनाच्या सूचना विचारात घेऊन कोणतीही पात्र आदिवासी कुटुंबे अंत्योदय अन्न योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाहीत, याची दक्षता घेण्याच्या सूचना दि.१६.०८.२००४ व दि.३.१०.२००५ च्या शासन पत्रात देण्यात आल्या होत्या**. तसेच दिनांक १७ सप्टेंबर, २०११ च्या

पत्रान्वये दिनांक ३१ मे, २०१० अखेर शिल्लक असलेला अंत्योदय अन्न योजनेचा इष्टांक जिल्हानिहाय निदर्शनास आणून देण्यात आला होता. सदर शिल्लक इष्टांकानुसार पात्र लाभार्थ्यांना अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिका वितरीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि शासनाने वरीलप्रमाणे वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिका वितरीत करताना काही जिल्ह्यांमधून शासन निर्णयाचे पूर्णपणे पालन झाले नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

५. ठाणे जिल्ह्यातील काही सामाजिक संस्थांनी / व्यक्तींनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहीत याचिका क्रमांक ३०/२०१० व त्यासोबतच्या अन्य जनहित याचिका क्रमांक ४०/२०१०, १८४/२०१० व ५०/२०१२ मध्ये संबंधित तालुक्यांच्या तहसिलदारांकडून अपूर्ण माहितीच्या आधारे शपथपत्र दाखल केल्याने मा. उच्च न्यायालयाने दिनांक २१/६/२०१३ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारीत केले आहेत.

१) आदिम जमातींच्या कुटुंबांची नावे सन १९९७ च्या बीपीएल यादीमध्ये नसली तरी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २० एप्रिल २००४ च्या आदेशानुसार अंत्योदय अन्न योजनेचे लाभ मिळण्यासाठी दारिद्रयरेषेखालील शिधापत्रिका असण्याची अट रद्द करण्याचे निर्देश केंद्र शासनास दिले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सदर आदेशानुसार राज्यशासनाने याबाबतच्या सूचना तात्काळ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणा-या जिल्ह्यांच्या संबंधित जिल्हाधिकारी यांना द्याव्यात.
२) आदिम जमातीच्या कुटुंबांना अंत्योदय अन्न योजनेचे कार्ड देण्याच्या प्रक्रियेस शिबीर आयोजित करून गती देण्यात यावी व त्याचा पाठपुरावा करावा आणि त्या संबंधीची माहिती वेळोवेळी स्थानिक सामाजिक संस्थांना देण्यात यावी.

६. राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश तसेच मा. उच्च न्यायालयाचे वरील आदेश विचारात घेऊन पुढीलप्रमाणे पुन्हा आदेश देण्यात येत आहेत.

**शासन निर्णयः-**

१) वर नमूद केल्याप्रमाणे, अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थ्यांची निवड करण्याकरीता केंद्र शासनाने व राज्य शासनाने वेळोवेळी वरीलप्रमाणे ज्या सूचना दिल्या आहेत त्या विचारात घेऊन इष्टांकाच्या मर्यादेत लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी.
२) केंद्र शासनाने दिनांक १६ मार्च, २००४ व १९ नोव्हेंबर, २००४ च्या पत्रान्वये राज्य शासनास सूचना दिल्या होत्या की अंत्योदय अन्न योजनेसाठी पात्र असलेल्या लाभार्थ्यांची नावे बीपीएल यादीत नसली तरी सुद्धा त्या पात्र लाभार्थ्यांना अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिका देण्यात याव्यात व त्याचवेळी त्यांची नावे बीपीएलच्या यादीत समाविष्ट करण्यात यावीत. तथापि केंद्र शासनाने संबंधित राज्य शासनास मंजुर केलेल्या एकूण बीपीएल व अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थ्यांच्या इष्टांकाच्या मर्यादेतच सदर लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी.

३) अंत्योदय अन्न योजनेच्या वाढीव शिधापत्रिका वितरीत करतांना अंत्योदय अन्न योजनेच्या इष्टांकाच्या मर्यादेत वाढ होत असेल तर पूर्वी निवडलेल्या लाभार्थ्यांची पात्रतेकरीता पडताळणी करून जे अपात्र आढळून येतील त्यांचा समावेश बीपीएल लाभार्थ्यांच्या यादीमध्ये करावा. त्याचप्रमाणे बीपीएल लाभार्थ्यांच्या इष्टांकाच्या मर्यादेत वाढ होत असेल तर जास्त उत्पन्न असणाऱ्या बीपीएल लाभार्थ्यांचा समावेश एपीएल (केशरी) लाभार्थ्यांच्या यादीमध्ये करावा.

४) अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिका आदिम जमातीच्या कुंटुंबांना वितरित करण्यासाठी आवश्यकता भासल्यास विशेष शिबिरांचे आयोजन करावे. तसेच यासाठी आवश्यकता भासल्यास स्थानिक सामाजिक संस्थांची मदत घेण्यात यावी.

५) ग्रामीण भागात प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थ्यांची निवड निश्चित झाल्यावर संबंधीत ग्रामसभेची त्या यादीस मान्यता घ्यावी. ज्या ग्रामसभा लाभार्थ्यांच्या यादीस मंजुरी देणार नाहीत, अशा ग्रामसभांना मंजुरी देण्याची पुन्हा विनंती करण्यात यावी. अशी विनंती केल्यानंतरही त्यांनी मंजुरी दिली नाही तर त्याचे कारण नमुद करून पात्र लाभार्थ्यांची यादी जिल्हाधिकारी स्तरावर घोषित करण्यात यावी.

६) कोणताही पात्र लाभार्थी अंत्योदय अन्न योजनेच्या लाभा पासून वंचित राहणार नाही, याचीही दक्षता घेण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०७१७१०५६११२९०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bapu Balasaheb Narayankar

Digitally signed by Bapu Balasaheb Narayankar
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=FCSCP, postalCode=400032, st=MAHARASHTRA, cn=Bapu Balasaheb Narayankar
Date: 2013.07.17 11:00:51 +05'30'

**बा.बा. नारायणकर**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४. सर्व विभागीय आयुक्त
५. सर्व जिल्हाधिकारी
६. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई

७. सर्व उपायुक्त (पुरवठा)
८. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
९. सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
१०.महासंचालक माहिती व जनसंपर्क, मुंबई.
११.खाजगी सचिव मा.मंत्री ( अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग )
१२.खाजगी सचिव मा.राज्यमंत्री ( अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग )
१३.प्रधान सचिव ( अ.ना.पु.व ग्रा.सं. विभाग ) यांचे वरीष्ठ स्विय सहायक
१४.सर्व उप सचिव/अवर सचिव/सर्व कार्यासने
१५.निवडनस्ती कार्यासन नापु-२८